मुंबई विद्यापीठ

मानव संसाधन विकास कक्ष
कक्ष क्र. २११, एम्.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in
ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in

दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४

क्र.मासंविक/आयसीसी/२०२३-२४/२८७६ दि. ८ जानेवारी, २०२४

# परिपत्रक

विषय:- शासन मान्य पदांचे लाड-पागे विषयक धोरण हे विद्यापीठ फंडावरील कायम कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती अनुज्ञेय न करणेबाबत.....

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, समन्वयक/संचालक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी उप परिसर, समन्वयक/संचालक, ठाणे व कल्याण उपकेंद्र, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थायी शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, लाड पागे विषय धोरण/नियुक्त्या विद्यापीठ फंडावरील पदास लागू करणेबाबतची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये बाब क्र.१३ अन्वये समोर ठेवण्यात आली होती त्याबाबतचा ठराव खालील प्रमाणे:-

> "लाड पागे विषय धोरणाबाबतचे/नियुक्त्या शासन निर्णय शासकीय कर्मचाऱ्यांसाठीच लागू आहेत. त्यामुळे ते विद्यापीठ फंडावरील पदास लागू करता येणार नाही. शासनाची ध्येय धोरणे वेळोवेळी बदलत आहेत. त्यानुसार ऑटोनॉमस कॉलेज, क्लस्टर विद्यापीठ या वेगवेगळया संकल्पना प्रत्यक्षात अंमलात येत आहेत व त्याचा प्रभाव विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या संख्येवरही होत आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित मोठमोठया महाविद्यालयांना ऑटोनॉमस/ क्लस्टर विद्यापीठ दर्जा प्राप्त झाल्याने या महाविद्यालयांकडून विद्यापीठास मिळणारे आर्थिक उत्पन्न कमी झालेले आहे. तसेच भविष्यातही यामुळे विद्यापीठाच्या आर्थिक बाबींवर मर्यादा येणार असल्याने सद्यस्थितीत विद्यापीठ फंडावरील लाड-पागे विषयक धोरण/नियुक्त्या विद्यापीठ प्रशासनास न परवडणाऱ्या असल्याने असे निर्णय (विद्यापीठ पदास लाड-पागे विषयक धोरण/नियुक्त्या) विचाराधीन घेता येणार नाही "

उपरोक्त ठरावानुसार लाड पागे विषय धोरणाबाबतचे/नियुक्त्या विद्यापीठ फंडावरील पदास लागू होणार नाही. सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

Baliram

(प्रा. बळीराम गायकवाड)
**प्रभारी कुलसचिव**

.....२/-

Scanned with OKEN Scanner

क्र.मासंविक/आयसीसी/२०२३-२४/२८७६ दि. ८ जानेवारी, २०२४

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे उप परिसर व संचालक, कल्याण उपकेंद्राचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, मानद विधी सल्लागार, विधी कक्ष सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ५) अधिष्ठाता

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा, मुंबई विद्यापीठ

२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन

३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

४) सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोशिएशन

५) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना

Baliram

(प्रा. बळीराम गायकवाड)
**प्रभारी कुलसचिव**

Scanned with OKEN Scanner